दि. २६ मे, २०२०

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## उन्हाळी सत्र परिक्षा २०२०

अंतीम वर्ष वगळता इतर वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या सन २०२० मधील उन्हाळी सत्र परिक्षेच्या निकालाबाबत बाबत चर्चा करण्यासाठी विद्यापीठाने दि. २० मे २०२० रोजी सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठातील विविध शैक्षणिक संकुलांचे संचालक तसेच मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांचे प्रमुख यांची बैठक (व्हिडीओ कॉन्फरंस)आयोजीत केली होती. सदर बैठकीमध्ये सर्वानुमते घेण्यात आलेल्या निर्णयांस मा. कुलगुरु महोदया यांनी तातडीची बाब म्हणून विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. ते निर्णय सोबतच्या परिपत्रकाप्रमाणेः

**-परिपत्रक-**

विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक संकुलाचे संचालक व प्रमुख, सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य, सर्व मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांचे प्रमुख वा संचालक, सर्व सहाय्यक कुलसचिव तसेच सर्व विद्यार्थी यांना या परिपत्रकाद्वारे, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांचे मनामध्ये कसल्याही प्रकारचा संभ्रम राहू नये व त्यांना परिक्षे संदर्भातील सर्व माहिती अवगत व्हावी या हेतूने खालील माहिती कळविण्यात येतेः

0१. विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन अंतिम वर्षाखेरीज इतर सर्व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन ग्रेडिंग नुसार करण्यात येईल. यासाठी ५0 टक्के गुण हे अंतर्गत तसेच ५0 टक्के गुण मागील परिक्षेमधील प्राप्त सरासरी गुण याचा आधार घेतला जाईल. सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्षामधे अथवा सत्रामधे प्रवेश दिला जाईल. मात्र अशा प्रकारे गुण देत असताना प्रवेशित विद्यार्थ्यांच्या परिक्षांच्या निकालाची कार्यवाही शासन आदेशान्वये ५0 टक्के चालू सत्रामधील अंतर्गत गुण व ५0 टक्के मागील सत्रामधील प्राप्त गुण ग्राह्य धरून करण्यात येईल.

उदा. बी. कॉम भाग एक, सत्र दोन च्या विद्यार्थ्याचे मूल्यमापन करीत असताना त्याला सत्र क्रमांक दोन मधे प्राप्त अंतर्गत गुणानुसार ५0 टक्के व सत्र क्र एक मधे त्याला प्राप्त गुणातील ५0 टक्के गुण धरून त्याचे अंतिम गुण काढले जातील.

प्रस्तुत विद्यापीठामध्ये सध्या परिक्षेचे ७0:३0, ४0:१0 तसेच ८0:२0 पॅटर्नस् प्रचलित आहेत. त्यामुळे शासन आदेशाप्रमाणे ५0:५0 टक्के अंतिम गुण काढत असताना, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार अंतर्गत ५0 टक्के गुणांसाठी पुढील पद्धतीचा अवलंब करावाः

अ. जे विद्यार्थी ७0:३0 पॅटर्न मधे आहेत त्यांच्यासाठी महाविद्यालयाने ३0 गुणांचे मूल्यमापन अगोदरच केलेले आहे. उर्वरीत २0 गुणांसाठी महाविद्यालयांनी आपापल्या विद्यार्थ्यांशी संपर्क साधून, त्यांना २0 गुणांसाठी प्रश्न देउन, त्यांचेकडून होम असाईमेंट पद्धतीने ते सोडवून घेउन व ऑनलाईन पद्धतीने उत्तरपत्रिका मागवून घेउन त्यांचे मूल्यमापन करून घ्यावे, असे सर्वानुमते ठरले आहे. ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन उत्तरपत्रिका जमा करणे शक्य नसेल त्यांच्याकडून महाविद्यालयांनी सामाजिक दूरतेचे सर्व निर्देश पाळून त्या जमा करून घ्यायच्या आहेत. यासाठी विषय शिक्षकांनी आपल्या विषयांसाठी एक स्वतंत्र इ-मेल आय डी तयार करुन त्यामधे सदर उत्तरपत्रिका मागवाव्यात. अशा इ मेलवर आलेल्या, तसेच इ-मेल शक्य नसेल तेथे इतर मार्गांनी आलेल्या उत्तरपत्रिका, या महाविद्यालयांनी इतर अंतर्गत गुणांच्या संबंधित कागदपत्रासोबत जतन करून ठेवणेच्या आहेत.

ब. जे विद्यार्थी ४0:१0 पॅटर्न मधे आहेत त्यांच्यासाठी महाविद्यालयाने १0 गुणांचे मूल्यमापन अगोदरच केलेले आहे. उर्वरीत १५ गुणांसाठी महाविद्यालयांनी वरीलप्रमाणे होम असाईमेंट घ्यावयाची आहे, जेणेकरून २५ गुण अंतर्गत

मूल्यमापन व २५ गुण मागील परफॉर्मंस या आधारे देणे शक्य होईल व शासनादेशीत ५०:५० गुण पद्धतीला बाधा येणार नाही. बाकीच्या सर्व बाबी वरील 'अ' मधे नमूद केल्याप्रमाणे लागू रहातील.

क. जे विद्यार्थी ८०:२० पॅटर्न मधे आहेत त्यांच्यासाठी महाविद्यालयाने २० गुणांचे मूल्यमापन अगोदरच केलेले आहे. उर्वरीत ३० गुणांसाठी महाविद्यालयांनी वरील प्रमाणे होम असाईमेंट घ्यावयाची आहे, जेणेकरून ५० गुण अंतर्गत मूल्यमापन व ५० गुण मागील परफॉर्मंस या आधारे देणे शक्य होईल व शासनादेशीत ५०:५० गुण पद्धतीला बाधा येणार नाही. बाकीच्या सर्व बाबी वरील 'अ' मधे नमूद केल्याप्रमाणे लागू रहातील.

वरीलप्रमाणे महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना दिलेले अंतर्गत गुण महाविद्यालयाने विद्यापीठाकडे **ई-मेल** द्वारे दि. ३० जून २०२० पर्यंत सादर करावयाचे आहेत. सदर गुण सादर करीत असताना ते पुढील तक्त्यामध्ये पाठवावेत.

| क्र | विद्यार्थ्याचे नाव | पी. आर. एन. क्र. | अंतर्गत गुण | | एकूण अंतर्गत गुण |
|---|---|---|---|---|---|
| | | | ३० पैकी | २० पैकी | ५० पैकी |
| | | | | | |
| | | | | | |

जर विद्यार्थी वार्षिक पद्धतीच्या अभ्यासक्रमातील असेल, व त्या अभ्यासक्रमामधे अंतर्गत मूल्यमापन पद्धती अस्तित्वात असेल, तर अंतिम वर्ष वगळता इतर परिक्षांचा निकाल हा अंतर्गत परिक्षेमधील गुण हे १०० टक्के ग्राह्य धरून काढला जाईल. परंतु ज्या अभ्यासक्रमांमध्ये अंतर्गत मूल्यमापन पद्धत नसेल, अशा अभ्यासक्रमामधील विद्यार्थ्यांचा मागील सत्रामधे प्राप्त गुणांनुसार निकाल जाहीर केला जाईल. या संदर्भात अवलंबविण्याची कार्यपद्धती विद्यापीठ स्वतंत्रपणे जाहीर करेल.

मात्र अशा विद्यार्थ्यांच्या च्या मागील परिक्षांतील अनुत्तीर्ण विषयांची परिक्षा ही, महाविद्यालये अथवा विद्यापीठातील विभाग अथवा परिसंस्था सुरु झाल्यानंतर १२० दिवसाच्या आंत घेण्यात येतील.

०२. टाळेबंदीचा कालावधी विद्यार्थ्याचा उपस्थित कालावधी म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

०३. एटीकेटीच्या नियमांमुळे ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधे प्रवेश मिळाला नव्हता, त्यांनादेखील पुढील वर्षामध्ये प्रवेश देण्यात येईल व त्यांच्या राहिलेल्या विषयांची परिक्षा ही, महाविद्यालये अथवा विद्यापीठातील विभाग अथवा परिसंस्था सुरु झाल्यानंतर १२० दिवसाच्या आंत घेण्यात येतील.

०४. जर एखादा विद्यार्थी वरीलप्रमाणे ५०-५० ग्रेडबाबत समाधानी नसेल, तर असा विद्यार्थी पुढील सत्रामधे होणा-या परिक्षेत प्रविष्ठ होउन आपल्या ग्रेडमधे सुधारणा करु शकतो.

०५. अंतीम वर्षाच्या परिक्षा, तसेच मागील सत्रांमधील अथवा वर्षामधील अनुत्तीर्ण विषयांच्या परिक्षा या बाबत ची पद्धती, कालावधी इत्यादिबाबतची माहिती विद्यापीठाकडून स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल. या परिक्षांचे वेळापत्रक महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे दि. २० जून नंतर जाहीर केले जाईल.

०६. ज्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही कारणास्तव परिक्षेचा फॉर्म अथवा अर्ज भरला नसेल, त्यांना सदर अर्ज दाखल करण्यासाठी दिनांक २५ जून २०२० पर्यंत मुदत देण्यात आली आहे, जेणेकरुन कोणीही विद्यार्थी परिक्षेपासून वंचित रहाणार नाही.

०७. एखाद्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना जर समर ट्रेनिंग अथवा इंटर्नशिप आवश्यक असेल व कोव्हिड -१९ च्या उद्रेकामुळे जर त्यांना सदर ट्रेनिंग अथवा इंटर्नशिप करणे शक्य नसेल, त्यांनी आपापल्या महाविद्यालयासोबत तसेच प्राध्यापकांसोबत चर्चा करून सदर ट्रेनिंग अथवा इंटर्नशिप कधी करावयाची आहे या बाबत निर्णय घ्यावा, तसेच त्या गुणांचे मूल्यांकन कधी व कसे करावयाचे आहे याचा निर्णय संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांवर सोपविलेला आहे.

०८. ज्या विद्यार्थ्यांची पी एच् डी अथवा एम् फील चे प्रबंध अथवा प्रबंधिका सादर करण्याची अंतिम तारीख किंवा कमाल मर्यादा विद्यापीठाच्या प्रचलित नियमांनुसार अथना अधिनियमांनुसार टाळेबंदीच्या काळामधे संपुष्टात आलेली असेल, अशा विद्यार्थ्यांना सदर प्रबंध, प्रबंधिका सादर करण्यासाठी तसेच इतर आवश्यक बाबींची पूर्तता करण्यासाठी सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात येत आहे.

०९. पी एच् डी अथवा एम् फील चे व्हायवा-व्होसे ऑनलाईन पद्धतीने घेण्यासाठी विद्यापीठाकडून कार्यवाही सुरु आहे. या बाबतची कार्यप्रणाली विद्यापीठाकडून नंतर जाहीर करण्यात येईल.

१०. स्वायत्त महाविद्यालये अथवा विभाग यांना देखील परिक्षा पद्धतीमध्ये एकसूत्रता यावी म्हणून वरील बाबींचा अवलंब करता येऊ शकेल.

११. या परिपत्रकामधलि सर्व मुद्दे हे केवळ सन २०२० मधे होणा-या उन्हाळी सत्र परिक्षेकरितांच लागू असतील.

मला प्राप्त आदेशांनुसार मी आपणांस कळवितो की वरील माहिती कृपया सर्व संबंधितांच्या निदर्शनांस आणून द्यावी, जेणेकरुन विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच शैक्षणिक क्षेत्रामधील इतर संबंधित यांच्या मनातील संभ्रमावस्था संपुष्टात येण्यास मदत होईल.

स्वाक्षरीत

स्थळः सोलापूर
दिनांकः २६ मे २०२०

सीए श्रेणिक शाह
प्रभारी संचालक
परिक्षा व मूल्यमापन मंडळ,
पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापुर

प्रति,
विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक संकुलांचे संचालक / प्रमुख, संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थांचे संचालक / प्रमुख, विद्यापीठाचे अधिकारी